# प्रेसनोट- दि. ११/०४/२०२४

## १३ अल्पवयीन बाल भिक्षेकऱ्यांची भिक मागण्यापासून मुक्तता.

विशेष बाल पोलीस कक्ष (SJPU), गुन्हे शाखा, मुंबई या कक्षाकडून बांगूरनगर पोलीस ठाणे हद्दीत मिठ चौकी जंक्शन, मढ-मार्वे रोड, मालाड पश्चिम येथे मोठया प्रमाणावर अल्पवयीन मुले भिक मागत असल्याची माहिती मिळविण्यात आली होती. सदर माहितीची विशेष बाल पोलीस कक्ष (SJPU),कक्षाकडून शहानिशा करण्यात आली. सदर माहिती बाबत वरिष्ठांना अवगत करून त्याअनुषंगाने वरिष्ठांच्या मार्गदर्शनानुसार बाल भिक्षेकरी मुक्तता मोहिमेचे आयोजन करण्यात आले.

दिनांक १०/०४/२०२४ रोजी सकाळी १०.३० वाजताच्या दरम्यान वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली मिठ चौकी जंक्शन, मढ-मार्वे रोड, मालाड पश्चिम येथे विशेष बाल पोलीस पथकाकडून बाल भिक्षेकरी मुक्तता कारवाईचे आयोजन करण्यात आले. सदर कारवाई मध्ये गुन्हे शाखेच्या अंमलबजावणी कक्ष, महिला अत्याचार प्रतिबंध कक्ष यांचे सहकार्य घेण्यात आले. त्यानुसार करण्यात आलेल्या कारवाईमध्ये एकुण १३ बाल भिक्षेकरी (०३ ते १५ वयोगटातील) भिक्षा मागताना मिळुन आले. व त्यांना भिक मागायला लावून त्यावर उदरनिर्वाह करणाऱ्या ०४ प्रौढ महिला भिक्षेकरी मिळून आल्या. १३ अल्पवयीन बाल भिक्षेकरी यांना बाल कल्याण समिती, मानखुर्द, मुंबई यांचे समक्ष सादर करण्यात आले. बाल कल्याण समितीच्या आदेशाने सदर बालकांना बालगृहात जमा करण्यात आले.

तसेच सदर कारवाईमध्ये अल्पवयीन मुलांना भिक्षा मागावयास लावून त्यावर उदरनिर्वाह करणाऱ्या ०४ प्रौढ महिला भिक्षेकरी यांना ताब्यात घेवून बांगुरनगर पोलीस ठाण्यास आणून बांगुरनगर पोलीस ठाणे वि.स्था.गु.र.क्र. २६९/२०२४ कलम २४ बाल न्याय (काळजी व संरक्षण) अधिनियम २००० सह कलम ५,९,११ भिक्षेकरी प्रतिबंधक कायदा १९५९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला व सदर गुन्हयात त्यांना अटक करण्यात आली.

सदरची कारवाई ही मा.पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. विवेक फणसाळकर, मा. विशेष पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) मुंबई, श्री. लखमी गौतम, मा.अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, मुंबई, श्री.शशि कुमार मीना, मा. पोलीस उप-आयुक्त, अंमलबजावणी मुंबई, श्रीमती. रागसुधा आर.यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. नितीन पोतदार, महिला पोलीस निरीक्षक, श्रीमती. अनिता कदम, महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक, श्रीमती.संगिता पाटील, मपोशि भोसले, मपोशि तळेकर, मपोशि बागल, मपोशि बुधे, मपोशि सोनकांबळे, विशेष बाल पोलीस युनिट- पोलीस उप निरीक्षक, श्री नंदकुमार कदम, सफौ. कदम, म.स.फौ मालवणकर, पो.ह. जेडगुळे, म.पो.ह. रश्मी हळर्णकर, पो.ह. वाघमारे, मपोशि बेलोसे, मपोशि दराडे, पो.ह. गोडसे, पोशि मोरे, पोशि घुगे, पोशि यादव, पोशि शिंदे यांनी यशस्वीरित्या केली.

....................